स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी करीता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षण संस्थाच्या विकासातील राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाची (रुसा) भूमिका- एक समाजशास्त्रीय अभ्यास

संशोधक

श्री. पाटील प्रमोद बळवंत

उपसंचालक - राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. नारायण तु. कांबळे

समाजशास्त्र विभागप्रमुख,
स्वामी विवेकानंद महाविदयालय,
शिरूर ताजबंद जि. लातूर.

एप्रिल - २०२२

महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षण संस्थाच्या विकासातील राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाची (रुसा) भूमिका- एक समाजशास्त्रीय अभ्यास

प्रस्तावना :

उच्च शिक्षणाची गुणवत्ता व पाया सबलीकरण करण्यासाठी एक छत्री योजना अभियान स्वरुपात राबविण्यासाठी केंद्र शासनाने "**राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा RUSA)**" हीयोजना 12 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये राबविण्याचे ठरविले. राष्ट्रीय उच्च शिक्षण पध्दती मध्ये संधी उपलब्धता, समानता आणि उच्चतम गुणवत्ता धारण करण्यासाठी उच्च शिक्षणात जलद कार्यक्षमता, पारदर्शकता आणि फलित निष्पत्ती व जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेचा उददेश आहे.

उच्च शिक्षणाची संधी सर्व घटकानां प्राप्त होणे, उच्च शिक्षण सर्वसमावेशक करणे आणि उच्च शिक्षणात उच्चतम गुणवत्ता निर्माण करणे यासाठी रुसा अभियान केंद्र शासनाने सुरु केले आहे.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील अस्तित्वात असलेल्या उच्च शिक्षण संस्थांची सर्वकष गुणवत्ता रुसांतर्गत विहीत केलेल्या मानके व प्रमाणकानुसार वाढ करणे, गुणवत्ता निर्धारण आराखडा प्रमाण मानून त्यानुसार मुल्यांकन पध्दती स्वीकृती करणे, उच्च शिक्षण पध्दतीत संस्था निहाय संरचना पध्दत बदलात्मक सुधारणा पोहचविणे, प्रशासकीय, शैक्षणिक आणि परीक्षण विषयक मूल्यमापन सुधारणांची खात्री करणे आणि शालेय शिक्षणाची व रोजगार उपलब्धता दुवेप्रस्थापित करणे. राजयामध्ये सलग्रीकरण पध्दतीमध्ये बदल करण्याच्या दृष्टीने पर्यायी व्यवस्था उपलब्ध करणे, उपलब्ध मानवी घटकयांच्या विविध स्तरावरील क्षमता विकसित करणे, शैक्षणिक संस्थामध्ये संशोधन आणि नवोपक्रम पुरविण्यासाठी सुयोग्य व सक्षम वातावरण निर्मिती करणे. शासनाचे कौशल्य विकासा श्रेणीत प्रयत्न शासनाच्या पर्याप्त अशा हस्तक्षेपाद्वारे एकसंघ करणे. समाजातील वंचित घटक,

स्त्रियांचा सहभाग वाढीस लावणे, अल्पसख्यांक, अनुसुचित जाती / जमाती व इतर मागासवर्ग आणि दिव्यांग घटक इत्यादी साठी पुरेशी संधी उपलब्ध करुन उच्च शिक्षणामध्ये समानता आणणे.

रुसाची उदिष्टे :

- ❖ अस्तित्वात असलेल्या स्वायत्त महाविद्यालयांचे उन्नतीकरण करुन विद्यापीठामध्ये रुपांतर करणे.
- ❖ महाविद्यालयांच्या समुहांचे विद्यापीठामध्ये रुपांतर करणे.
- ❖ विद्यापीठास भौतिक सोई सुविधा प्राप्तीसाठी अनुदान देणे.
- ❖ नवीन मॉडेल कॉलेज स्थापन करणे.
- ❖ पदवी महाविद्याल यांचे मॉडेल डिग्री कॉलेज मध्ये रुपांतर करणे.
- ❖ नवीन व्यावसायिक महाविद्यालये स्थापन करणे.
- ❖ महाविद्यालयांना भौतिक सुविधा उपलब्धतेसाठी अनुदान देणे.
- ❖ महाविद्यालये / विद्यापीठानां संशोधन नवोपक्रम आणि गुणात्मक सुधारणाकरणेसाठी प्रोत्साहन व अनुदान देणे.
- ❖ उच्च शिक्षणात समानता आणणे.
- ❖ शिक्षण संवर्ग भरतीसाठी सहाय्यक अनुदान देणे.
- ❖ शिक्षण संवर्गाची गुणवत्ता व कौशल्य वाढीसाठी योजना राबविणे.
- ❖ उच्च शिक्षणास व्यवसायाभिमुख बनविणे.
- ❖ एम आय एस प्रणालीची स्थापना करणे.
- ❖ तंत्र निकेतन संस्थानां सहाय्य करणे.

रुसा योजनेंतर्गत सन 2015 ते 2022 (मार्चअखेर) पर्यत विविध विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालये (शासकीय) यांना अनुदान वाटप करण्यात आले आहे. या लाभार्थी संस्थांची संख्या 85 पर्यंत पोचली आहे यामध्ये भौतिक सुविधा, नुतनीकरण, व उपकरण खरेदी या घटकांवर सदरचा निधी या संस्थानी खर्च केला आहे. त्यातून या संस्थांची खूप प्रगती होवून नॅक स्कोर सुधारण्यास खूप मदत झाली आहे.

सदर अभ्यासामुळे मी माझ्या संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

संबंधित संशोधन साहित्याचा आढावा :

सध्या रुसा या योजनेंतर्गत प्रकाशित व अप्रकाशित संशोधन कार्य खूप मोठ्या प्रमाणात झालेले नाही. तरी देखील काही संशोधनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. संबधित संशोधन विषयाशी निगडीत माहिती पुढील कार्यकाळात संकलित करून त्यावर अभ्यासपूर्ण संशोधन कार्य करण्यात येईल.

१. Effective implementation of RUSA in GER of HEIS या विषयावर मनीषा सहानी, संशोधक व मोनिका सूद यांनी संशोधन केले आहे.
२. A study of prospects of Higher Education in the context of RUSA हा संशोधन विषय निझार कचरी, डॉ. जदाब दुत्ता यांनी केलेला आहे.
३. RUSA : Our nation's dreame- Science and Education publishing, हा संशोधन विषय मीरा दहाल, संतोष कुमार बेहेरा यांनी केलेला आहे.
४. RUSA – present Higher Education Trends in India, या विषयावर डॉ. बाळू आणि राजकुमार यांनी संशोधन केले आहे.

प्रस्तुत संशोधनाची उदिदष्टे:

1. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाची (रुसा) पार्श्वभूमी जाणून घेणे.
2. 21 व्या शतकातील रुसाची भूमिका समजून घेणे.
3. शैक्षणिक विकास व परिवर्तनातील रुसाची भूमिका समजून घेणे.
4. संस्था व विद्यापीठ विकासातील रुसाचे योगदान जाणून घेणे.
5. रुसा अनुदानामुळे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये (Hypothesis):

संशोधनाची उदिदष्टे समोर ठेवून अध्ययनात जी गृहितकृत्ये मांडलेली आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत-

1. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान(रुसा) मुळे शैक्षणिक संस्थेत बदल होतानां दिसून येत आहे.
2. रुसा अनुदानामुळे संस्था व विद्यापीठांचा विकास होताना दिसून येत आहे.
3. रुसाच्या अनुदानामुळे शैक्षणिक संस्थेमधील संशोधनास गती प्राप्त झालेली आहे.
4. रुसा अनुदान प्राप्त संस्थेत अमुलाग्र परिवर्तन दिसून येत आहे.
5. रुसा मुळे शिक्षण घेणाया व संशोधक विद्यार्थ्यानां सोयी सुविधा उपलब्ध होताना दिसून येत आहेत.
6. रुसाचे धोरण सर्व शिक्षण क्षेत्रातील अनुदान पात्र संस्थांना विकासाभिमुख परिवर्तनासाठी उपयुक्त ठरलेले दिसून येत आहे.

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन विषय "**महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षण संस्थाच्या विकासासाठी (रुसा) राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाची भूमिका- एक समाजशास्त्रीय अभ्यास**" हा विषय महाराष्ट्रातील रुसा अनुदानित संस्थाच्या क्षेत्रापुरतीच मर्यादित राहणार आहे. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील रुसाच्या वतीने अनुदान प्राप्त संस्था व विद्यापीठ यांचा समावेश असणार आहे. संबधित संस्था व विद्यापीठ यांची संशोधनासाठी निवड केली जाणार आहे. प्रस्तुत संशोधनाकरिता विषयानुरूप संस्था व विद्यापीठातील ५० रुसा संचालक व नोडल अधिकारी यांची उत्तरदाता म्हणून निवड केली जाणार आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी अभ्यास क्षेत्र म्हणून महाराष्ट्र राज्याची निवड केलेली आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था व विद्यापीठातून उत्तरदात्यांची नमुना निवड करून संशोधन केले जाणार आहे. अशा समग्रातील संशोधकाने निवडक नमुना संशोधन पद्धतीच्या सहाय्याने निवड करून अभ्यास केले जाणार आहे.

प्रस्तुत अभ्यासाचे क्षेत्र महाराष्ट्र राज्य असून "**महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षण संस्थाच्या विकासासाठी (रुसा) राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाची भूमिका- एक समाजशास्त्रीय अभ्यास**" या संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन करण्याचा प्रयत्न केले जाणार आहे. हा अभ्यास पूर्ण करण्यासाठी संपूर्ण क्षेत्रातील माहितीचा आधार घेवून प्रस्तुत शोधप्रबंध सादर केले जाईल.

नमुना निवड पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील रुसा अनुदान प्राप्त ५० संस्था व विद्यापीठाची यादी तयार करून अभ्यासाच्या सोयीनुसार प्रत्येक उत्तरदात्याकडून मुलाखत अनुसुचीच्या माध्यमातून माहिती प्राप्त केले जातील. संशोधन कर्त्याने यासाठी सोबतच नमुना निवडीतुन विषयानुरुप प्रतिनिधिक स्वरुपाच्या ज्या संस्था व विद्यापीठ येतील त्यातील आवश्यकतेनुसार उत्तरदाते महाराष्ट्रातून विविध संस्था व विद्यापीठातील रुसा संचालक व नोडल अधिकारी माहिती प्राप्त केली जाणार आहे. नमुना निवड पध्दतीचा वापर करुन संशोधन करण्याचा प्रयत्न केले जातील.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आलेली आहे. कारण या पध्दतीमुळे संकलित तथ्यांचे विश्लेषण केले जाते. या विश्लेषणातून संशोधन विषयाचे वैशिष्टये व स्वरुप अभ्यासले जातील. त्यामुळे हा संशोधन आराखडा या संशोधनात उपयुक्त ठरतो. संशोधन विश्व हे महाराष्ट्रातील रुसा अनुदान प्राप्त संस्था व विद्यापीठ असणार आहेत.

तथ्य संकलनाची साधने :

प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे.

१. प्राथमिक स्त्रोत :

संशोधन विश्व हे महाराष्ट्रातील रुसा अनुदान प्राप्त संस्था व विद्यापीठ असणार आहेत. अनुदान प्राप्त संस्था व विद्यापीठ स्तरावर रुसा संचालक व नोडल अधिकारी म्हणून कार्य करणाऱ्या व्यक्तींची निवड करून त्यांच्या कडून मुलाखत अनुसूची आणि संस्था व विद्यापीठ निरीक्षण तंत्राच्या सहाय्याने तथ्य संकलित केली जाणार आहेत.

२. दुय्यम स्त्रोत :

प्राथमिक स्त्रोताला पुष्टी देण्यासाठी दुय्यम स्त्रोतात, शासनाने काढलेले निर्णय, रुसाचे विविध निर्णय, शैक्षणिक धोरण, उपलब्ध प्रकाशित व अप्रकाशित आकडेवारीचाही विचार करण्यात येणार आहे. शासकीय दस्ताऐवज, शासकीय सर्वेक्षणे, संशोधन प्रबंध, विविध पुस्तके, ग्रंथसूची, विश्वकोश, अप्रकाशित शोधनिबंध, मासिके, त्रैमासिके व पाक्षिके यांचा अवलंब केला जाणार आहे.

Research Milestones :

S. No	Quarter	Milestone
I	3months	Collection of secondary necessary information from higher educational institutions
II	3months	Preparation of Interview Schedule, Interview Guideline, pretesting and finalization of tools
III	6 months	Field Work and Data Collection
IV	2months	Coding and Tabulation
V	2months	Data Analysis
VI	5months	Report writing First draft
VII	2 months	Report writing Second Draft
VIII	1 month	Finalization of report

प्रकरण योजना :

- ❖ प्रकरण पहिले : प्रस्तावना
- ❖ प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती
- ❖ प्रकरण तिसरे : राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाची (रुसा) पार्श्वभूमी
- ❖ प्रकरण चौथे : रुसा अनुदान प्राप्त संस्था व विद्यापीठाचे विकास व परिवर्तनाचा अभ्यास
- ❖ प्रकरण पाचवे : राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाशी संबंधित संकलित माहितीचे विश्लेषण
- ❖ प्रकरण सहावे : निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथ सूची :

1. RUSA 1.0, Guideline, Ministry of Human Resource Development, Dept.of Education, Central Government of India.
2. RUSA 2.0, Guideline, Ministry of Human Resource Development, Dept. of Education, Central Government of India.
3. RUSA Brochure, Ministry of Human Resource Development, Dept. of Education, Central Government of India.
4. RUSA Scheme document, Ministry of Human Resource Development, Dept. of Education, Central Government of India.
5. Website Central Govt – http://rusa.nic.in वेब पोर्टलवरील माहितीचा आधार.
6. Website State Govt – http://rusa.maharashtra.gov.in वेब पोर्टलवरील माहितीचा आधार
7. केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले जी.आर व परिपत्रके
8. राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले जी.आर. व परिपत्रके
9. भांडारकर, पु. ल. (1987), 'सामाजिक संशोधन पध्दती': साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.
10. आहूजा, राम.(2005),'सामाजिक सर्वेक्षण एवं अनुसंधान', रावत पब्लिकेशन्स, जयपूर.
11. खैरनार, दिलीप (2011) 'प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी' डॉयमंड पब्लिकेशन्स, पुणे.
12. प्रदिप आगलावे, (2015), सामाजिक संशोधन पध्दतीशोस्त्र व तंत्रे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
13. बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, (2007), सामाजिक संशोधन पध्दती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
14. भिंताडे वि. रा., (2011), शैक्षणिक संशोधन पध्दती, नित्यनुतन प्रकाशन, पुणे.

संशोधक

श्री. पाटील प्रमोद बळवंत
उपसंचालक - राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. नारायण तु. कांबळे
स्वामी समाजशास्त्र विभागप्रमुख,
विवेकानंद महाविदयालय,
शिरूर ताजबंद जि. लातूर.